# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १७/१२/२०२४ चे ठराव**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८०४** | **विषय क्रमांक - ८०४**

**दिनांक - १७/१२/२०२४** | **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८०४<br>दिनांक -<br>१७/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/१०/कावि/२७९/२०२४ दि.०६/१२/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४४१० दि.१०/१२/२०२४ अन्वये, मनपाचे वायसीएम रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना ११ मजली नवीन इमारतीत रात्र निवारा केंद्र उपलब्ध करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८०४<br>दिनांक -<br>१७/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.वायसीएमएच/१०/कावि/२७९/२०२४ दि.०६/१२/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४४१० दि.१०/१२/२०२४ अन्वये, महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील तसेच लगतच्या ग्रामीण भागातून व जिल्ह्या बाहेरील रुग्ण वैद्यकीय उपचारासाठी दिर्घकाळ दाखल/ॲडमिट होत असतात. काही रुग्णांच्या बाबतीत नातेवाईकांना रुग्णाजवळ २४ तास थांबणे आवश्यक असते. रात्र निवा-याची सोय रुग्णालयात तसेच रुग्णालयाच्या जवळपास कोठेही उपलब्ध नाही. असे रुग्ण नातेवाईक वायसीएम रुग्णालयात रात्रीच्या वेळी मिळेल त्या जागेवर उघड्यावर झोपतात. त्यामुळे रूग्ण नातेवाईकांची गैरसोय होते. या सर्व बाबी विचारात घेऊन पिंपरी चिंचवड मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालया समोरील आवारात महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या ११ मजली इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सदर ठिकाणी तळमजल्यावर फिजिओथेरपी विभागालगतच्या जागेत रुग्णांच्या नातेवाईकांकरीता (1365.41sqm) रात्रनिवारा केंद्राचे नियोजन करणेत आले आहे.<br><br>सदर ठिकाणी नातेवाईकांनी स्वत: विश्रांती घेवून त्यांच्या रुग्णाची देखभाल अथवा सुषृशा करणे अभिप्रेत आहे. रात्र निवारामध्ये पुरुषांसाठी ३५ बेड्स व महिलांसाठी २५ बेड्सची सुविधा करण्यात आली असून त्या ठिकाणी भविष्यात आवश्यक जागेच्या उपलब्धतेप्रमाणे बेड्सची संख्या कमी - जास्त करता येवू शकते. महिला व पुरुषांसाठी प्रत्येकी ५-५ स्वच्छतागृहे व आंघोळीसाठी ५-५ बाथरूमची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. ज्या नातेवाईकांना रात्र निवा-याची आवश्यकता असेल अश्या गरजू, दुर्बल नातेवाईकांना अत्यंत अल्प दरात रात्र निवा-याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. रात्र निवारा केंद्र २४ तास सुरू राहणार आहे. सद्यस्थितीत मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे कडील आदेश क्र.वैद्य/१३/कावि/६०९/२०२२ दि.२५/०७/२०२२ अन्वये पिंपरी चिंचवड शहरातील रुग्ण वायसीएम रुग्णालयात दाखल झाल्यास र.रु.३०/- प्रतिदिन बेडचार्जेस लागू आहेत. |

| | |
|---|---|
| | तसेच पिंपरी चिंचवड हद्दीबाहेरील रुग्णांना अधिकचे २०% म्हणजेच र.रु.३६/- प्रतिदिन बेडचार्जेस लागू आहेत. वायसीएम रुग्णालयातील वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता (MSW) यांनी दि.१८ व १९ ऑक्टोबर २०२४ रोजी सर्वेक्षण केले. सर्वेक्षणाच्या प्राप्त अहवालानुसार एकूण १०० नातेवाईकांशी प्रत्यक्ष संपर्क साधण्यात आला. १०० पैकी ९३ नातेवाईकांनी रात्रनिवा-याची योग्य सोय असावी व रात्रनिवा-याचे दर प्रति दिन र.रु.५०/- पेक्षा कमी असावे असे म्हणणे मांडले आहे.<br><br>रात्रनिवारा या करिता प्रवेशाचे नियम व अटी खालीलप्रमाणे असतील-<br><br>१. सदर रात्र निवारा केंद्र प्रवेशासाठी अर्जदाराचा रुग्ण आंतररुग्ण विभागामध्ये दाखल असणे आवश्यक आहे.<br><br>२. कक्ष प्रवेशासाठी प्रवेश अर्ज भरणे व **MSW** यांचे कडून मंजूर करून घेणे आवश्यक आहे.<br>३. प्रवेश अर्जा सोबत ओळखपत्र म्हणून आधारकार्ड /पॅनकार्ड /ड्रायविंग लायसन /पासपोर्ट / मतदान कार्ड /यापैकी एक जोडणे आवश्यक राहील.<br>४. केंद्रा मध्ये धुम्रपान **,** मद्यपान**,** व अमली पदार्थ यावर बंदी असेल ते करताना आढळल्यास दंड आकारुन प्रवेश रद्द करुन कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.<br>५. दररोज शुल्क दुपारी १२.००वा .पर्यंत भरणे आवश्यक आहे . व त्याची पावती **MSW** यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे .अन्यथा सदरचा बेड इतर नातेवाईकास दिला जाईल.<br>६. अर्जदार महिलांसोबत बारा वर्षाखालील मुलांना मोफत प्रवेश देण्यात येईल.<br>७. रात्र निवारा कक्षामध्ये बाह्य खाद्यपदार्थ खाण्यास व बनविण्यास परवानगी नाही.<br>८. पुरुषांना स्त्रीयांच्या कक्षामध्ये व स्त्रीयांना पुरुषांच्या कक्षा मध्ये प्रवेश करणेस मनाई आहे . सदर ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार आढळल्यास पोलीस कारवाई करण्यात येईल.<br>९. रुग्ण नातेवाईकाच्या सर्व वस्तूंची जबाबदारी त्यांची वैयक्तीक राहील .त्यास प्रशासन जबाबदार राहणार नाही.<br>१०. निवारा केंद्रात शांतता बाळगून नियमांचे पालन करणे बंधनकाराक राहिल.<br><br>११. निवारा केंद्रात स्वच्छता राखणे बंधनकारक आहे. तसेच आंतरुग्ण दाखल असलेल्या नातेवाईकांना एकाच व्यक्तीला रात्रनिवाराचा लाभ मिळेल.<br><br>१२. रात्र निवारामध्ये फक्त बेडची सुविधा उपलब्ध असेल, त्यावरील पांघरुन आणण्याची जबाबदारी संबंधित नातेवाईंकांची राहिल.<br><br>१३. राहण्याकरीता शुल्क भरुन पावती तयार झाल्यास कोणत्याही कारणास्तव ती रद्द केली जाणार नाही व त्याच रक्कम परत अदा करता येणार नाही.<br><br>सबब, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालया समोरील नवीन ११ मजली इमारतीत |

| | |
|---|---|
| | महिला व पुरुषांसाठी रात्र निवारा केंद्र सुरू करण्यास, त्यात प्रवेश घेणा-या पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रुग्ण नातेवाईकांकडून प्रतिदिन र.रु.४०/- व मनपा हद्दीबाहेरील रुग्ण नातेवाईकांकडून र.रु.५०/- प्रति दिन शुल्क आकारण्यास व सदरची शुल्क रक्कम यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालया कडील "इतर जमा व खर्च" या लेखाशिर्षका अंतर्गत जमा करणेस मान्यता देणे आवश्यक आहे. तसेच महिला निवारा कक्षास नातेवाईकांकडून प्रतिसाद न मिळाल्यास सदर महिला निवारा कक्ष पुरुष कक्षात रुपांतर करण्यास, तसेच सदर रात्र निवारा केंद्रास सहा महिने कालावधीत ६०% पेक्षा कमी प्रतिसाद मिळाल्यास केंद्र बंद करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्या मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८०५** **विषय क्रमांक - ८०५**

**दिनांक - १७/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८०५<br>दिनांक -<br>१७/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र इक्षेका/वि/कावि/५३९/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत प्रकल्पातील विद्युत रोहित्रसंच व इतर सुरक्षा विषयक कामे करणे (डुडुळगाव) या कामाचे खर्च रक्कम रू.१७,००,००,०००/- (वाढीव रक्कम रू.१६,००,००,०००/-) यांस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८०५<br>दिनांक -<br>१७/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र इक्षेका/वि/कावि/५३९/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका इ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत मोशी येथील डुडळगावमध्ये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत निवासी गाळे बांधणेचे स्थापत्य विभागाचे काम चालु आहे. सदर निवासी गाळयांना भोसरी सबस्टेशन वरून म.रा.वि.वि.कं.लि.चा उच्चदाब विजपुरवठा घेणे आवश्यक आहे. सदरचे स्थापत्य विषयक कामामध्ये म.रा.वि.वि.कं.लि.चा उच्चदाब विजपुरवठा घेणे कामाचा समावेश नाही. सदरचे स्थापत्य विषयक कामासोबत विद्युत विषयक काम करणे आवश्यक आहे.<br><br>प्रधानमंत्री आवास योजना, डुडळगाव येथे म.रा.वि.वि.कं.लि.चा उच्चदाब विजपुरवठा घेणेसाठी कामाचे शासनाच्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन त्यामध्ये 22 kV, 3 x 300 sq.mm. cable Joint, Half round pipe, RMU, 22KV HT metering cubical,Transformer, Transformer Auxilliary Monitoring System, HT Bay या साहित्यांचा समावेश आहे.सदरच्या कामास शासनाच्या दरसुचीनुसार र.रू.१७,००,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात |

| | |
|---|---|
| | "इतर विशेष कामे व बी.ओ.टी.प्रकल्प" या लेखाशिर्षकावरील पान क्र.४५ व अ.क्र.३ वर सदर कामास प्रशासकिय मान्यता रक्कम रू.१,००,००,०००/- असुन तरतुद रक्कम रू.५०,००,०००/- इतकी आहे. सदरचे काम करणे आवश्यक असलेने सदर कामाची निविदा विषयक प्रशासकिय कार्यवाही करणेसाठी याकामाचे खर्च रक्कम रू.१७,००,००,०००/- (वाढीव रक्कम रू.१६,००,००,०००/-) मा.महापालिका सभेची सुधारीत प्रशासकिय मान्यता मिळणे आवश्यक आहे.सबब, प्रधानमंत्री आवास योजना, डुडळगाव येथे म.रा.वि.वि.कं.लि.चा उच्चदाब विजपुरवठा घेणेसाठी मनपाचे सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात "इतर विशेष कामे व बी.ओ.टी.प्रकल्प" या लेखाशिर्षकावरील पान क्र.४५ व अ.क्र.३ वरील कामास सुधारीत रक्कम रू.१७,००,००,०००/- (वाढीव रक्कम रू.१६,००,००,०००/-) इतकी सुधारीत प्रशासकिय मान्यता मिळणे तसेच या कामास सन २०२४-२५ च्या सुधारीत व सन २०२५-२६ च्या मुळ अंदाजपत्रकात तरतुद उपलब्ध होण्याच्या उमेद मान्यतेवर निविदा विषयक पुढील कार्यवाही करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८०७** **विषय क्रमांक - ८०७**

**दिनांक - १७/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८०७<br>दिनांक -<br>१७/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. विमुका/कावि/हक्षेका/५५२/२०२४ दि.०९/१२/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४४१८ दि.१०/१२/२०२४ अन्वये, मनपाचे विद्युत मुख्य विभागाकडील तरतूदीमध्ये वाढ घट करणेकामी मान्यता देणे बाबत. |

ठराव क्र. ८०७

दिनांक - १७/१२/२०२४

मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. विमुका/कावि/हक्षेका/५५२/२०२४ दि.०९/१२/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४४१८ दि.१०/१२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ‘ह’ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामधील विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे चालू असुन सदर कामास तरतूद कमी पडत असल्याने खालील नमूद केल्याप्रमाणे सदर विषयांकित कामावरती वाढ - घट करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नांव | लेखाशिर्ष नांव | अंदाजपत्रक पानांक व अ.क्र. | बजेट कोड | अंदाजपत्रकीय रक्कम | उपलब्ध तरतूद र.रु. २०२४-२५ | तरतूद वाढ र.रु | तरतूद घट र.रु | सुधारित तरतुद रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेट्रो प्रकल्पांतर्गत दापोडी ते पिंपरी मेट्रो पुलाखाली सुशोभित खांब व दिवे बसविणे. | स्थापत्य प्रकल्पांतर्गत विद्युत विषयक कामे | ३१८/११५ | २३२४०३२३८ | २,००,००,००० | ५,७५,००,००० | ० | २९,५५,००० | ५,४५,४५,००० |
| २ | वाय.सी.एम.एच येथील यु.पी.एस सिस्टीमची (UPS System) वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.(सन २०२३-२४) | मुख्यालय-महसुलीकामे | ३६१/२०८ | २३२४०३४७९ | २०,००,००० | ४,००,००० | ६,४४,००० | ० | १०,४४,००० |
| ३ | वाय.सी.एम.एच. रुग्णालयामधील १०१० के.व्ही.ए. जनित्र संचाची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.(सन २०२३-२४) | मुख्यालय-महसुलीकामे | ३६१/२१८ | २३२४०३४९८ | २५,००,००० | ५,००,००० | ८,८५,००० | ० | १३,८५,००० |
| ४ | वाय. सी. एम. एच. येथील अत्यावश्यक विद्युतीकरण, APFC Panel, गिझर व इन्वर्व्हर्टर, ACB/RMU, व Transformer Substation, सौरउर्जा यंत्रणा, हायमास्ट दिवे व कारंज्याची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. (सन २०२३-२४) | मुख्यालय-महसुलीकामे | ३६१/२१५ | २३२४०३४९३ | ३०,००,००० | ५,००,००० | १४,२६,००० | ० | १९,२६,००० |
| | एकुण र.रु. | | | | २,७०,००,००० | ५,८९,००,००० | २९,५५,००० | २९,५५,००० | ५,९८,००,००० |

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८०८** **विषय क्रमांक - ८०८**

**दिनांक - १७/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

ठराव क्र. ८०८

दिनांक - १७/१२/२०२४

मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. हक्षेका/वि/कावि/५५१/२०२४ दि.०९/१२/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४४१९ दि.१०/१२/२०२४ अन्वये, मनपाचे विद्युत मुख्य विभागाकडील नविन कामाचा समावेश व

तरतूद वर्गीकरण करणेस  मान्यता देणे बाबत.

ठराव क्र. ८०८
दिनांक -
१७/१२/२०२४

मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. हक्षेका/वि/कावि/५५१/२०२४ दि.०९/१२/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४४१९ दि.१०/१२/२०२४ अन्वये, मनपाचे “ह” क्षेत्रिय कार्यालयांतर्गत यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये ९ ऑपरेशन थेटर, ३ मोठे ICU, १ NICU, प्रसुतीगृह ,पोस्ट –ऑपरेटीव्ह ,प्री-ऑपरेटीव्ह इ. अत्यावश्यक ठिकाणी २४ तास विजपुरवठा होणेकरिता ८० KVA चे ४ UPS कार्यान्वित आहेत. सध्याचे UPS हे सन २०११ पासून कार्यान्वित असून सदरच्या UPS मध्ये वारंवार तांत्रिक बिघाड होत असल्यामुळे, सदर उत्पादित कंपनी M/S Eaton यांनी  दि.२०/०७/२०२४ च्या पत्रान्वये नविन UPS बसविणेबाबत कळविले आहे. सध्या कार्यान्वित असणारे UPS मध्ये अचानक बिघाड होऊन ऑपरेशन थेटर, ICU, NICU मध्ये अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरची UPS यंत्रणा तात्काळ बदलणे आवश्यक आहे. सदर कामाचा सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात समावेश नसल्याने अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात २०२४-२५ मध्ये समावेश करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्र. | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नांव | लेखाशिर्ष नांव | **अंदाज पत्रक पानांक व अ.क्र.** | बजेट कोड | अंदाजपत्रकीय रक्कम | उपलब्ध तरतूद र.रु. २०२४-२५ | तरतूद  वाढ र.रु | तरतूद घट र.रु | सुधारित  तरतुद रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेट्रो प्रकल्पांतर्गत दापोडी ते पिंपरी मेट्रो पुलाखाली सुशोभित खांब व दिवे बसविणे. | स्थापत्य प्रकल्पांतर्गत विद्युत विषयक कामे | ३१८/ ११५ | २३२ ४०३ २३८ | २,००,००,०००/- | ५,७५,००,०००/- | ० | ४०,००,०००/- | ५,३५,००,०००/- |
| २ | वाय.सी.एम रुग्णालय येथे नविन UPS यंत्रणा बसविणेचे काम करणे. (सन २०२४-२५) | मुख्यालय - भांडवली कामे | नव्याने समावेश | नव्याने समावेश | १,२०,००,०००/- | ० | ४०,००,०००/- | ० | ४०,००,०००/- |
| | एकुण र.रु. | | | | ३,२०,००,०००/- | ५,७५,००,०००/- | ४०,००,०००/- | ४०,००,०००/- | ५,७५,००,०००/ |

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका  सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक  - ८०९** **विषय क्रमांक - ८०९**

**दिनांक - १७/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

ठराव क्र. ८०९
दिनांक -
१७/१२/२०२४

मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र .पअक/०३/कावि/२१५/२०२४
दिनांक -  १७ / १२ /२०२४ अन्वये, मनपाचे उपद्रवशोध पथकाअंतर्गत आकरण्यात येणा-या दंडाकरिता नवीन लेखाशीर्ष व दोन  वेगवेगळे Account No. व QR Code सह स्वाईप मशिन उपलब्ध करणेबाबत.

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८०९<br>दिनांक -<br>१७/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र .पअक/०३/कावि/२१५/२०२४<br>दिनांक - १७ / १२ /२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड शहरातील नदी-नाले यांचे प्रदूषणास जबाबदार असणारे नागरिक तसेच रस्त्याच्या कडेला राडा-रोडा टाकणाऱ्यावर नियंत्रण ठेवणे, वायु प्रदूषण व जलप्रदूषण यासह पर्यावरणास हानी पोहचविणाऱ्या दोषींवर करवाई करण्याकरिता लघुत्तम निविदाधारक ठेकेदार मे.शुभम उद्योग व मे. सैनिक इंटलिजन्स ऍन्ड सिक्यूरिटी प्रा.लि. यांना कामाचा आदेश देण्यात आला आहे. सदर कामाच्या निविदा अटी शर्तीनुसार मनपा कार्यक्षेत्रात पर्यावरणाचे प्रदूषण करणाऱ्या दोषींवर अशा प्रकारची कारवाई केल्यानंतर दोषी आढळणा-या व्यक्ती, कारखाने, संस्था इत्यादींकडून दंड वसूल करुन मनपा कोषागरात भरुन घेणे बंधनकारक आहे. तसेच याकामी ठेकेदार यांना मनपा कोषागरात जमा होणा-या रक्कमेच्या ६०% रक्कम कामाचे स्वरूपानुसार अदा करणे व ४०% रक्कम मनपा निधीत जमा करणे असे या कामाचे स्वरूप आहे. सद्यस्थितीत सुरु असलेल्या कामांतर्गत आकारण्यात येणाऱ्या दंडाची रक्कम मनपाच्या “राडारोडा संकलन शुल्क आकारणी” या लेखाशिर्षावर जमा करण्यात येत आहे. तथापि सदर लेखाशिर्षावर पर्यावरण अभियांत्रिकी विभागातील इतरही शुल्क भरुन घेण्यात येत आहे. त्यामुळे ठेकेदार मे.शुभम उद्योग व मे. सैनिक इंटलिजन्स ऍन्ड सिक्यूरिटी प्रा.लि. यांनी कारवाई केल्यानंतर निविदा अटी शर्तीनुसार मनपा कोषागरात निश्चित किती रक्कम भरुन घेतली व त्यापोटी ठेकेदारास देय असलेली रक्कम निश्चित करणेस अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे विषयांकित कामाकरिता पर्यावरण अभियांत्रिकी विभागातील अंदाजपत्रकामध्ये **“उपद्रव शोध दंड/नुकसान भरपाई (१)” व “ उपद्रव शोध दंड / नुकसान भरपाई (२)”** या नांवाने नव्याने लेखाशिर्ष निर्माण करुन त्याचे दोन वेगवेगळे Account Number व QR Code या विभागास उपलब्ध करुन प्रत्यक्ष साईटवर उपद्रव शोध पथकामार्फत कारवाई केल्यानंतर तात्काळ दंडाची रक्कम वसुल करणेकरिता सदर Account च्या प्रत्येकी दोन याप्रमाणे किमान ०४ स्वाईप मशीन या विभागास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तरी पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रात नियुक्त करणेत आलेल्या स्वतंत्र एजन्सीमार्फत करणेत येणा-या कारवाई करिता **“उपद्रव शोध दंड/नुकसान भरपाई (१)” व “उपद्रव शोध दंड / नुकसान भरपाई (२)”** असे दोन Account No. व QR Code सह ४ स्वाईप मशिन पर्यावरण अभियांत्रिकी विभागास लेखा विभागामार्फत उपलब्ध करुन देणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८१०** **विषय क्रमांक - ८१०**

**दिनांक - १७/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८१०<br>दिनांक -<br>१७/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र .भा.आ./पापु प्रकल्प/०२/४५०/२०२४<br>दिनांक - १७ / १२ /२०२४ अन्वये, आंद्रा धरणामधून ३६.८७ द.ल.घ.मी. मंजुर बिगर सिंचन पाणी आरक्षणापोटी निघोजे को. प. बंधा-यातून उपसा करणेत येणा-या पाण्याचे पाणीपट्टी देयक अदा करणेस मान्यता देणे बाबत. |

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८१०<br>दिनांक -<br>१७/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र .भा.आ./पापु प्रकल्प/०२/४५०/२०२४<br>दिनांक - १७ / १२ /२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस घरगुती वापरासाठी आंद्रा मध्यम प्रकल्प /इंद्रायणी नदी/ देहू येथील को.प. बंधा-यातुन ३६.८७ द.ल.घ.मी. मंजुर बिगर सिंचन पाणी आरक्षणापोटी महानगरपालिकेमार्फत कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे यांचे समवेत दि.१४/१२/२०२२ ते दि.१३/१२/२०२८ या कालावधीकरीता दि.१४/१२/२०२२ रोजी करारनामा करणेत आला आहे. सदर करारनाम्यातील अटी/ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (मजनिप्रा) यांचेकडील दि.२९/०३/२०२२ रोजीचे ठोक जलप्रशुल्क निर्धारण आदेशातील तरतुदीनुसार दरवर्षी १ जुलै ते ३० जून या कालावधीकरीता पाटबंधारे विभागाकडून देयकाची आकारणी केली जाते.<br>दर दोन महिन्याच्या अंतराने मंजुर वार्षिक पाणी कोटा व दोन महिन्याचा पाणीवापर विचारात घेऊन पाणीपट्टी देयक पाटबंधारे विभागाकडून महानगरपालिकेस सादर केले जाते. कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे यांचे समवेत केलेला करारनामा अन्वये / शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश/ परिपत्रके/अधिनियम/नियमावली इ. महानगरपालिकेवर बंधनकारक असून वेळोवेळी सुधारीत नियम/निर्देशांच्या अनुषंगाने पाणीपट्टी आकारणी केली जाईल व ती महानगरपालिकेस भरणे बंधनकारक असेल. सदरचे पाणीपट्टी देयक महानगरपालिका अंदाजपत्रकातील **"क अंदाजपत्रक महसुली खर्च मधील २) ५१०२: शुध्द अशुध्द जलउपसा केंद्र (पाणीपुरवठा विभाग) मधील अ.क्र.११) २३०२०-०२: पाणीपुरवठा देयके – पाटबंधारे विभाग"** या लेखाशिर्षाअंतर्गत अदा केले जाते.<br>महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (मजनिप्रा) यांचेकडील दि.२९/०३/२०२२ रोजीचे ठोक जलप्रशुल्क निर्धारण आदेश व यानंतर वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशातील प्रचलित दरानुसार पुणे पाटबंधारे विभागास पाणीपट्टी देयक अदा करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८११** **विषय क्रमांक - ८११**

**दिनांक - १७/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८११<br>दिनांक -<br>१७/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.आप/०६/कावि/६८६/२०२४<br>दिनांक- १७/१२/२०२४ अन्वये, तात्पुरता जाहिरात फलक ऑनलाईन पध्दतीने उभारणे संबधी कामकाज रद्द करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८११<br>दिनांक -<br>१७/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.आप/०६/कावि/६८६/२०२४<br>दिनांक- १७/१२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियामातील) नियम२४४, २४५ तसेच जाहिरात व फलक नियंत्रण नियम,२००३ चे अधिनियमातील तरतुदीनुसार महापालिकेची पूर्वपरवानगी घेऊनच महानगरपालिकेच्या तसेच खाजगी जागेत जाहिरात फलक उभा करणेस परवानगी देणेत येते. मात्र महानगरपालिकेची पूर्वपरवानगी न घेता खाजगी जागांवर अनधिकृतरित्या वासे-बांबू वरती वाढदिवस / श्रध्दांजली / शुभेच्छा / अभिनंदन / इतर जाहिरातीचे फ्लेक्स/ |

| | |
|---|---|
| | बॅनर लावल्याचे दिसून येत आहेत. त्या बाबत अनेक माध्यमातून नागरीकांच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे शहरास बकालपणा आलेचे दिसून येत आहे व शहराचे विद्रुपीकरण होत आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सौदर्यात भर घालणेकामी मनपाच्या मोजक्याच जागेमध्ये वेगवेगळया ठिकाणी तात्पुरते बासे-बांबूवर जाहिरात फलक उभे करण्याबाबत आकाशचिन्ह व परवाना विभागातील परवाना निरीक्षक तसेच मनपा क्षेत्रीय कार्यालयातील ज्युनि. इंजिनीअर यांनी सर्व्हे करून संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरासाठी एकूण १३५ जागा निश्चित करून, तेथे तात्पुरते जाहिरात फलक कमीत कमी १ व जास्तीत जास्त ७ दिवस (नियमानुसार ६x३, ८x३, ८x६ या मोजमापापैकी योग्य ते मोजमापासह) ऑनलाईन पध्दतीने उभे करणेस मा. आयुक्त यांनी दि.१२.०१.२०२२ रोजीच्या प्रस्तावाने मान्यता दिलेली होती. त्यानुसार दिनांक १०.०२.२०२२ रोजी जाहिर प्रकटण प्रसिध्द करण्यात आले होते, त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयास यावर नियंत्रण ठेवणे बाबत आदेश देण्यात आले होते. प्रत्यक्षपणे या पध्दतीचा गैरवापर होताना दिसून येतो, नागरीकांपेक्षा या योजनेचा गैर फायदा घेऊन व्यवसाय करीत आहेत. एक परवाना घेऊन त्यांच्या झेरॉक्स काढून अनेक जागांवर जाहिरात फलक लावतात, तसेच मनपाने नेमून दिलेल्या जागे व्यतिरीक्त अन्य जागांवर जाहिरात फलक उभे करतात, एकच व्यक्ती/संस्था सलग त्याच ठिकाणी जाहिराती लावतात व त्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होते, काही वेळेस रस्त्यालगत लावलेल्या फलकांने वाहतूकीस अडथळा निर्माण होत असून त्यामुळे अनेक नागरीकांच्या तक्रारी येउन नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे. सबब सदरची ऑनलाईन पध्दतीने तात्पुरता जाहिरात परवाना देणेची पध्दत रद्द करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८१२** **विषय क्रमांक - ८१२**

**दिनांक - १७/१२/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८१२ दिनांक - १७/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.भूजि/३/कावि/३०७/२०२४ दि.१७/१२/२०२४ अन्वये, ई-निविदा सुचना क्र.३/२०२४-२५ साठी सर्वोच्च दराची निविदा स्विकृत करून निविदे प्रमाणे देय केलेली रक्कम भरून घेणे व जागेचा ताबा देणेबाबत. |
| ठराव क्र. ८१२ दिनांक - १७/१२/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.भूजि/३/कावि/३०७/२०२४ दि.१७/१२/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीचे ताब्यात असलेल्या औद्योगिक विभागातील जागेचे निवासी विभागात रूपांतर करताना भुखंडात बांधकाम परवानगी देताना Amenities साठी (Public Utilities) सार्वजनिक सोई सुविधांसाठी सुविधा क्षेत्र भुखंड (Amenity Space) १० वर्षे कालावधीसाठी सर्वात जास्त एक रकमी रक्कम देणा-यास भाडेतत्वावर देणेकामी इच्छुक संस्था व्यक्ती यांचेकडून ई-निविदा अर्ज मागविणेत आले होते. |

<table>
<tr>
<td></td>
<td>सदर ई-निविदा सुचना क्र. ३/२०२४-२५ मधील प्रथम सर्वोच्च निविदाधारकाचे दर स्विकृत करून रक्कम भरून घेऊन जागेचा ताबा देणेबाबतचा दर दर्शविणारा तपशिल खालीलप्रमाणे
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मिळकतीचा तपशील</th><th>मनपाचा १० वर्षे कालावधीचा दर र.रू.</th><th>प्रथम सर्वोच्च निविदाधारकाचे नाव</th><th>देय भाडे दर र.रू.</th></tr>
<tr><td>1</td><td>मौजे आकुर्डी येथील स.नं. १४७/१+२ सि.स.नं. ५२२१ क्षेत्रफळ १६०६.४४ चौ.मी.</td><td>1,15,38,206/-</td><td>श्री. जयंत माधवराव पवार</td><td>1,90,33,660/-</td></tr>
</table>
उपरोक्त प्रमाणे निविदाधारकाची सर्वोच्च दराची निविदा स्विकृत करून निविदा अटी शर्तीप्रमाणे पुर्तता करीत असल्याने त्यांचेकडून रक्कम भरून घेऊन जागेचा १० वर्षे कालावधीकरीता ताबा देणेस महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ७९ क नुसार मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.</td>
</tr>
<tr>
<td>निर्णय</td>
<td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td>
</tr>
</table>

**सही/-**
**(चंद्रकांत पोपट इंदलकर)**
**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**